# मतदारसंघ पुनर्रचना व अहमदनगर जिल्हयातील 2009 च्या लोकसभा निवडणुकीचा अन्वयार्थ

प्रा. अर्चना सभाष फुलारी
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत जि.अहमदनगर

भारतीय संविधानाने प्रातिनिधिक लोकशाही शासनपध्दतीचा स्वीकार केला आहे. भारतीय संविधानानुसार वय वर्ष अठरा पूर्ण झालेल्या प्रत्येक स्त्री–पुरूषाला मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकास आपला प्रतिनिधी निवडण्याचा पूर्ण हक्क प्राप्त झाला आहे. भारतामध्ये निवडणुका, राजकीय पक्ष, मतदारसंघ, विधिमंडळ अशा लोकशाहीतील महत्त्वपूर्ण घटकांची पायाभरणी ब्रिटीश राजवटीतच झाली. भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी व श्रेष्ठ लोकशाही मानली जाते.त्यामुळे भारतात निवडणुकांच्या राजकारणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. 'निवडणुका' हा भारतीय लोकशाही व्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ होय. भारतातील निवडणुकांची संपूर्ण जबाबदारी भारतीय संविधानाच्या चार स्तंभापैकी एक मानल्या जाणाऱ्या निवडणूक आयोगावर सोपविली आहे. (भारतीय राज्यघटना कलम 324) 1 भारतासारख्या खंडप्राय देशात प्रादेशिक मतदारसंघ हा भारतीय लोकशाही राजकीय प्रकियेचा एक महत्त्वाचा आधार आहे. भारतात राष्ट्र, घटकराज्य व जिल्हा या पातळयांवरील राजकारणात सहभागी होण्यासाठी प्रादेशिक मतदारसंघ हा महत्त्वपूर्ण ठरतो. विशिष्ट भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या लोकसंख्येनुसार लोकसभा व विधानसभा मतदारसंघ तयार केले जातात. भारतात अशाप्रकारे मतदारसंघ पुनर्रचना आयोगाद्वारे तयार केले जातात.2 निवडणूक आयोगाने मतदारसंघ पुनर्रचनेच्या कार्यासाठी स्वतंत्र परिसीमन आयोग नेमण्यात यावा, अशी शिफारस केंद्र सरकारकडे केली होती.3 निवडणूक आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार संसदेने 1952 मध्ये मतदारसंघ परिसीमन कायदा मंजूर केला व 1953 मध्ये संसदेत कायदा करून पहिल्या परिसीमन आयोगाची निर्मिती करण्यात आली. भारतात आतापर्यंत 1953, 1963, 1973 व 2002 या साली संसदेने कायदे करून वेगवेगळया चार मतदारसंघ पुनर्रचना आयोगांची स्थापना केली आहे.

मतदारसंघ पुनर्रचना –

"भारतातील लोकसभा व घटक राज्यांच्या विधानसभा यांच्या मतदारसंघांची रचना ही विशिष्ट भौगोलिक प्रदेश व लोकसंख्येच्या प्रमाणात पुनर्रचित करणे म्हणजे मतदारसंघ पुनर्रचना होय."

मतदारसंघ पुनर्रचना आयोग –

भारतीय राज्यघटनेच्या कलम 81 व कलम 82 मध्ये मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची तरतूद केलेली आहे. मतदारसंघ पुनर्रचना आयोगालाच 'परिसीमन आयोग' किंवा 'Boundary Commission' किंवा 'Delimitation Commission' असेही म्हणतात.

मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची रचना पुढीलप्रमाणे –

1. सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश हे या आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
2. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त हे पदसिद्ध सदस्य असतात.

3. घटकराज्याच्या निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त हे पदसिद्ध सदस्य असतात.
4. सहयोगी सदस्य म्हणून 10 सदस्य असतात या 10 सदस्यांपैकी संबंधित घटकराज्यातून लोकसभेचे व विधानसभेचे प्रत्येकी 5 सदस्य असतात. लोकसभेतील 5 सहयोगी सदस्यांची नियुक्ती लोकसभेचे सभापती करतात. परंतु या सहयोगी सदस्यांना मतदानाचा अधिकार नसतो.4

मतदारसंघ पुनर्रचना आयोगाच्या रचनेनुसार भारतात आतापर्यंत चार आयोगांनी अनुक्रमे 1951,1961,1971 व 2001 च्या जनगणना अहवालानुसार मतदारसंघाची पुनर्रचना केली. लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची दर दहा वर्षांनी पुनर्रचना केली जावी अशी तरतूद भारतीय संविधानात आहे. संविधानानुसार ‘लोकसंख्या’ हा मतदारसंघ पुर्नरचनेचा मुख्य निकष आहे. परंतु 1976 च्या 42 व्या घटनादुरूस्तीनुसार 2001 पर्यंत मतदारसंघ हे 1973 च्या मतदारसंघ पुनर्रचनेप्रमाणे राहतील अशी तरतूद करण्यात आली. त्यामुळे 1981 व 1991 च्या जनगणनेनुसार लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना केली गेली नाही. 2001 मध्ये संसदेने कायदा करून 2001 च्या जनगणनेप्रमाणे 2026 पर्यंत लोकसभा व विधानसभा मतदारसंघ कायम राहतील, अशी तरतूद केली. त्यामुळे 2011 व 2021 च्या जणगणनेनुसार मतदारसंघांची पुर्नरचना केली जाणार नाही. संसदेने कायदा करून 10 वर्षांऐवजी 20 वर्षांनी मतदारसंघाची पुनर्रचना करण्याचे ठरविल्यामुळे कोणत्याही मतदारसंघाला कमीतकमी चार निवडणुकांसाठी तरी नव्या बदलांना सामोरे जावे लागणार नाही.5

चौथा परिसीमन आयोग –

संसदेने 2002 मध्ये न्या.कुलदीप सिंग यांच्या अध्यक्षतेखाली चौथ्या परिसीमन आयोगाची नियुक्ती केली. या आयोगाने राज्यांच्या लोकसंख्येच्या सरासरीनुसार सर्व मतदारसंघात समान लोकसंख्या या तत्त्वानुसार मतदारसंघाची पुनर्रचना केली आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या सरासरीनुसार मतदारसंघातील लोकसंख्या निर्धारित करण्यात आली होती. हे तत्त्व या पुनर्रचनेत डावलले गेल्याचे दिसते. याप्रमाणेच आयोगाला जिल्हा पातळीवरील निकषांमध्ये जास्त प्रमाणात फेरबदल करू दिले गेले नाहीत. कारण त्या ठिकाणीच स्थानिक पातळीवरील मुख्य राजकारण चालते. गाव, तालुका, जिल्हा, मतदारसंघ इत्यादींच्या पुनर्रचनेतूनच सध्या राज्यांतर्गत राजकारणाची जुळवाजुळव होत असल्याचे दिसते.6

मतदारसंघाची पुनर्रचना म्हणजे केवळ भौगोलिक व प्रशासकीय सीमारेषांची पुनर्रचना नाही, तर मतदारसंघांची पुनर्रचना म्हणजे राज्य, जिल्हा व मतदारसंघातील आर्थिक व सामाजिक संबंधांची फेरजुळणी होय. चौथ्या परिसीमन आयोगानुसार, अहमदनगर जिल्हयातील केवळ मतदारसंघांची पुनर्रचना झाली नाही तर अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणाचीच पुनर्रचना झाली आहे. ती पुढीलप्रमाणे –

अहमदनगर जिल्हयातील मतदारसंघाची पुनर्रचना – 2002 च्या चौथ्या परिसीमन आयोगाने 2006 मध्ये अहमदनगर जिल्हयातील दोन लोकसभा मतदारसंघाची व 13 विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली. अहमदनगर जिल्हयामध्ये पुनर्रचनेपूर्वी दोन लोकसभा मतदारसंघ होते. पुनर्रचनेनंतरही दोन लोकसभा मतदारसंघ राहिले. ते पुढीलप्रमाणे –

तक्ता कं. 1

अहमदनगर जिल्हयातील लोकसभा मतदारसंघाचे वर्गनिहाय विभाजन –

| अ.क. | मतदारसंघाचे नाव | वर्गीय विभाजन |
|---|---|---|
| 1 | अहमदनगर लोकसभा मतदारसंघ | सर्वसाधारण वर्गासाठी |
| 2 | शिर्डी लोकसभा मतदारसंघ | अनुसूचित जातीसाठी राखीव |

संदर्भ – परिसीमन आयोग अहवाल – 2008

अहमदनगर जिल्हयातील लोकसभा मतदारसंघाची संख्या चौथ्या परिसीमन आयोगाने कायम ठेवली. परंतु जिल्हयांतर्गत मतदारसंघामध्ये फार मोठे बदल झाले. तिसऱ्या परिसीमन आयोगानुसार, अहमदनगर दक्षिण

लोकसभा मतदारसंघ (अहमदनगर लोकसभा मतदारसंघ) हा अनुसूचित जातीसाठी राखीव होता, तर कोपरगाव लोकसभा मतदारसंघ किंवा अहमदनगर उत्तर लोकसभा मतदारसंघ (शिर्डी लोकसभा मतदारसंघ) सर्वसाधारण वर्गासाठी खुला होता. यामध्ये बदल होऊन अहमदनगर लोकसभा मतदारसंघ हा सर्वसाधारण वर्गासाठी तर शिर्डी लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव करण्यात आला.7

अहमदनगर लोकसभा मतदारसंघ –

अहमदनगर लोकसभा मतदारसंघ हा जिल्हा पातळीवर दक्षिण लोकसभा मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. या लोकसभा मतदारसंघात शेवगाव, राहुरी, पारनेर, अहमदनगर शहर, श्रीगोंदा, कर्जत–जामखेड या सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. मतदारसंघ पुनर्रचनेनुसार या मतदारसंघात चार बदल झाले. राहुरी व पारनेर या दोन मतदारसंघांचा या मतदारसंघात नव्याने समावेश करण्यात आला. अहमदनगर शहर हा एकच शहरी मतदारसंघ व इतर पाच मतदारसंघ ग्रामीण अशी नवी रचना निर्माण झाली.8 अहमदनगर शहरातील हिंदू व मुस्लिम असे मतदारांचे ध्रुवीकरण होत असते. परंतु ग्रामीण भाग वाढल्यामुळे हिंदू–मुस्लिम असे मतदार ध्रुवीकरणाचे जुने धोरण बदलण्याची शक्यता निर्माण झाली. शिर्डी लोकसभा मतदारसंघ राखीव असल्यामुळे जिल्हयाच्या उत्तर भागातील नेतृत्वाने दक्षिण भागाकडे लक्ष केंद्रित केल्याने जिल्हयातील राजकीय समीकरणे बदलली आहेत.

शिर्डी लोकसभा मतदारसंघ –

चौथ्या परिसीमन आयोगाने केलेल्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार, जुन्या कोपरगाव लोकसभा मतदारसंघाऐवजी शिर्डी हा लोकसभा मतदारसंघ तयार करण्यात आला. या मतदारसंघात अकोले (अनुसूचित जमातीसाठी राखीव), संगमनेर, शिर्डी, कोपरगाव, श्रीरामपूर (अनुसूचित जातीसाठी राखीव), नेवासा या मतदारसंघांचा समावेश केला आह.9 जुन्या मतदारसंघाच्या तुलनेत या मतदारसंघात पुढीलप्रमाणे बदल झाले –

1. अकोले व नेवासा या दोन मतदारसंघांचा नव्याने समावेश करण्यात आला.
2. राहुरी व पारनेर हे दोन जुन्या लोकसभा मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघ नवीन लोकसभा मतदारसंघातून वगळण्यात आले.
3. अनुस्चित जमातींचे संख्याबळ प्रभावी असणारा अकोले मतदारसंघ या मतदारसंघास जोडण्यात आला.
4. शिर्डी लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव तर या मतदारसंघातील एक विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी, एक अनुसूचित जमातीसाठी व चार विधासभा मतदारसंघ सर्वसाधारण वर्गासाठी खुले करण्यात आले. त्यामुळे मतदारसंघातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली.

लोकसभा व विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेचा सर्वाधिक राजकीय फटका दक्षिण नगर जिल्हयाला बसला. कारण पारनेर व राहुरी असे दोन मतदारसंघ अहमदनगर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट केल्याने या मतदारसंघातील नगर उत्तर (नगर व नेवासे परिसर) व पाथर्डी हे दोन मतदारसंघ अस्तित्वहीन झाले. अहमदनगर लोकसभा मतदारसंघात 2009 पूर्वी असलेल्या विधानसभा मतदारसंघात भौगोलिक व राजकीय बदल झाले. नगर तालुका मतदारसंघांचे विभाजन झाले. या तालुक्यातील आठ महसूल मंडळांपैकी प्रत्येक दोन मंडळे शेजारच्या विधानसभा मतदारसंघास जोडले गेले. त्यामुळे नगर तालुक्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ राहिला नाही. शेवगाव मतदारसंघ पाथर्डी मतदारसंघास जोडला गेल्याने पाथर्डीसही स्वतंत्र राजकीय अस्तित्व राहिले नाही.

मतदारसंघ पुनर्रचना व अहमदनगर जिल्हयातील लोकसभा मतदारसंघातील बदलत्या राजकारणाचे विश्लेषण –

अहमदनगर जिल्हा हा राजकीयदृष्टया अतिशय जागृत मानला जातो.10 महाराष्ट्राच्या राजकारणावर नगर जिल्हयाचे राजकारण तेथील नेते, चळवळी, चळवळे लोक (अण्णा हजारे, पोपटराव पवार इ.) इत्यादींच्या भूमिकांचा मोठा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे अहमदनगर

जिल्हयातील मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच्या काळातील राजकारणाला देखील महत्त्व प्राप्त होते. मतदारसंघ पुनर्रचनेममुळे विविध पातळयांवरील राजकारणात बदल होऊन नवीन सत्तासमीकरणे आकाराला येतात. त्यामुळे मतदारसंघातील मतदाराच्या राजकीय वर्तनाची फेरजुळणी झाली आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्हयातील लोकसभा मतदारसंघातील बदलत्या राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच्या 2009 च्या लोकसभा निवडणुकीचा विश्लेषणात्मक आढावा पुढीलप्रमाणे – 2009 च्या लोकसभा निवडणुकीत गांधी घराण्याचा करिश्मा, सोनिया गांधी व राहुल गांधी यांचे नेतृत्व, पंतप्रधान मनमोहन सिंग यांची प्रतिमा त्याप्रमाणेच विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविल्याने जनतेने परत एकदा मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला. या जोरावरच कॉंग्रेस व त्याचे मित्र पक्ष यांच्या संयुक्त पुरोगामी आघाडीने लोकसभा निवडणूकीत पुन्हा यश प्राप्त केले. कॉंग्रेस हा सर्वाधिक जागा जिंकून मोठा पक्ष ठरला.11 परंतु कॉंग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्हयात याउलट परिस्थिती निर्माण झाली होती.

तक्ता क. 2

37 अहमदनगर लोकसभा निवडणूक 2009

एकुण मतदार 1515480, पुरूष 785155, स्त्री 730325, मतदान केंद्रे 1939

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | विधानसभा मतदार संघ निहाय झालेले मतदान | | | | | | पोस्टल मते | एकुण मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शेवगाव | राहुरी | पारनेर | नगर शहर | श्रीगोंदा | कर्जत–जामखेड | | |
| 1 | शिवाजी कर्डिले | राष्ट्रवादी कॉ. | 32858 | 50878 | 55980 | 29173 | 51518 | 44759 | 150 | 265316 |
| 2 | कारभारी शिरसाठ | भाकप | 2215 | 1448 | 2651 | 785 | 2313 | 2439 | 2 | 11853 |
| 3 | तुकाराम गडाख | बसपा | 1524 | 2039 | 1913 | 975 | 2360 | 2684 | 13 | 11508 |
| 4 | दिलीप गांधी | भाजपा | 49445 | 36763 | 55077 | 42279 | 65550 | 57645 | 288 | 312047 |
| 5 | सझीद काझी | रिपाई एकतावादी | 771 | 455 | 767 | 428 | 745 | 931 | 2 | 4099 |
| 6 | मानुदास हाके | रा. सा. पा. | 367 | 304 | 324 | 143 | 454 | 1737 | 0 | 3329 |
| 7 | मानुदास होले | भारिप | 279 | 197 | 335 | 230 | 185 | 467 | 1 | 1694 |
| 8 | अरूण कहार | अपक्ष | 233 | 175 | 279 | 96 | 145 | 219 | 0 | 1147 |
| 9 | अविनाश घोडके | अपक्ष | 474 | 315 | 482 | 83 | 495 | 559 | 0 | 2408 |
| 10 | अर्जुन खैरे | अपक्ष | 893 | 720 | 875 | 226 | 650 | 989 | 0 | 4353 |
| 11 | बाळासाहेब गायकवाड | अपक्ष | 369 | 234 | 432 | 70 | 248 | 361 | 3 | 1717 |
| 12 | नौशाद शेख | अपक्ष | 916 | 488 | 788 | 311 | 538 | 755 | 0 | 3796 |
| 13 | महेंद्र शिंदे | अपक्ष | 2114 | 1212 | 916 | 396 | 830 | 1331 | 1 | 6800 |
| 14 | एकनाथ राऊत | अपक्ष | 1370 | 752 | 585 | 190 | 507 | 714 | 0 | 4118 |
| 15 | राजीव राजळे | अपक्ष | 64255 | 33322 | 12476 | 20465 | 8962 | 13252 | 63 | 152795 |
| | एकूण | | 158083 | 129302 | 133880 | 100850 | 135500 | 128842 | 523 | 786980 |

स्त्रोत – निवडणूक आयोग भारत सरकार, लोकसभा निवडणूक अहवाल 2009

अहमदनगर लोकसभा मतदारसंघ –

चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या 2009 च्या पहिल्या निवडणुकीत या मतदारसंघातून भाजपने दिलीप गांधी यांना तर राष्ट्रवादी कॉंग्रेसने शिवाजीराव कर्डीले यांना उमेदवारी दिली. तर उमेदवारी न मिळाल्याने तुकाराम गडाख व राजीव राजळे यांनो अपक्ष निवडणूक लढवली. या निवडणूकीत 1999 च्या निवडणुकीप्रमाणेच पुन्हा एकदा मराठा समाजातील कर्डीले, राजळे व गडाख यांच्यात मतविभागणी झाली. श्री.दिलीप गांधी यांना युतीची हक्काची मते व कॉंग्रेस आघाडीची नाराजांची मते मिळाली. कॉंग्रेस आघाडीची हक्काची मते कर्डीले, राजळे व गडाख यांच्यामध्ये विभागली गेली. तसेच बाळासाहेब विखे पाटील समर्थकांची मिळालेली साथ यांमुळे अल्पसंख्याक असलेल्या दिलीप गांधी यांना या निवडणुकीत विजय मिळवता आला. नगर शहर, श्रीगोंदा, कर्जत–जामखेड या मतदारसंघात त्यांना चांगली मते मिळाली. त्यांनी शिवाजीराव कर्डिले यांचा 46,731 मतांनी पराभव केला. या निवडणुकीत भाजपला 39.65: तर राष्ट्रवादीला 33.71: मते मिळाली.

तक्ता क. 3

38 अहमदनगर लोकसभा निवडणूक 2009

एकुण मतदार 1319875, पुरूष 687607, स्त्री 641268, मतदान केंद्रे 1628 |

| अ. क. | उमेदवाराचे नाव | पक्ष | विधानसभा मतदार संघ निहाय झालेले मतदान | | | | | | पोस्टल मते | एकुण मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अकोले | संगमनेर | शिर्डी | कोपरगाव | श्रीरामपूर | नेवासा | | |
| 1 | कचरू वाघमारे | बसपा | 995 | 994 | 1483 | 1396 | 2279 | 1257 | 4 | 8408 |
| 2 | भाऊसाहेब वाकचौरे | शिवसेना | 45352 | 57781 | 64367 | 66148 | 69511 | 56615 | 147 | 359921 |
| 3 | रामदास आठवले | रिपाई आठवले | 34532 | 34152 | 36830 | 41337 | 38924 | 41359 | 36 | 227170 |
| 4 | सुचित घोत्रे | कांती सेना | 982 | 808 | 912 | 1276 | 1002 | 1066 | 6 | 6052 |
| 5 | सतीश पडघलमल | पी.आर.पी. | 332 | 244 | 216 | 264 | 211 | 300 | 0 | 1567 |
| 6 | गर्जेद्र आडागळे | अपक्ष | 350 | 308 | 277 | 214 | 199 | 574 | 1 | 1923 |
| 7 | रमेश कांबळे | अपक्ष | 369 | 237 | 212 | 258 | 194 | 420 | 0 | 1690 |
| 8 | अण्णासाहेब गायकवाड | अपक्ष | 312 | 218 | 240 | 261 | 235 | 317 | 1 | 1584 |
| 9 | बाळू बागूल | अपक्ष | 305 | 296 | 317 | 369 | 696 | 266 | 0 | 2249 |
| 10 | प्रफुल्लकुमार मेढे | अपक्ष | 557 | 273 | 210 | 315 | 204 | 330 | 0 | 1889 |
| 11 | अण्णासाहेब राक्षे | अपक्ष | 526 | 344 | 343 | 266 | 246 | 315 | 0 | 2040 |
| 12 | ॲड.प्रेमनंद रूपवते | अपक्ष | 7845 | 5522 | 2319 | 2513 | 2412 | 2171 | 5 | 22787 |
| 13 | शरद लोंढे | अपक्ष | 1190 | 715 | 646 | 806 | 602 | 667 | 0 | 4626 |
| 14 | गंगाधर वाघ | अपक्ष | 1743 | 1029 | 942 | 800 | 782 | 999 | 0 | 6295 |
| 15 | सुधीर वैरागर | अपक्ष | 1422 | 906 | 1034 | 848 | 900 | 1216 | 0 | 6326 |
| 16 | अनिल साबळे | अपक्ष | 225 | 219 | 254 | 248 | 259 | 274 | 1 | 1480 |
| 17 | संदीप भारस्कर | अपक्ष | 1169 | 1561 | 1289 | 1234 | 1285 | 1334 | 2 | 7874 |
| | एकुण | | 98206 | 105607 | 111891 | 118553 | 119941 | 109480 | 203 | 663881 |

स्त्रोत – निवडणुक आयोग भारत सरकार, लोकसभा निवडणूक अहवाल 2009

(तक्ता – शिर्डी लोकसभा)

शिर्डी लोकसभा मतदारसंघ –

2009 च्या निवडणूकीत या मतदारसंघातून कॉंग्रेस–रिपाई आघाडीचे रामदास आठवले, शिवसेनेचे भाऊसाहेब वाकचौरे यांसह एकूण सतरा उमेदवारांनी निवडणूक लढवली. शिर्डी लोकसभा मतदारसंघ हा विखेंचा पारंपारिक मतदारसंघ असून 1971 पासून विखे या मतदारसंघातून सातत्याने निवडून आले आहेत. परंतु राज्याच्या राजकारणात शरद पवार विरूध्द बाळासाहेब विखे–पाटील यांचे राजकीय हाडवैर प्रसिध्द आहे.12 त्यामुळेच मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच्या या निवडणुकीत विखे–पाटील यांचा पत्ता कापण्याकरिताच राष्ट्रवादीने विखेंच्या विरोधी भूमिका घेऊन शिर्डीची उमेदवारी कॉंग्रस पक्षाला दिली. याचा फटका रामदास आठवले यांना बसला. कॉंग्रेसचे कार्यकर्तेही आठवले यांच्या उमेदवारीवर नाराज होते. याउलट भाऊसाहेब वाकचौरे हे साईसमाधी मंदिराचे कार्यकारी अधिकारी असताना त्यांचा या मतदारसंघात संपर्क होता. तसेच आठवले हे बाहेरचे आहेत. असा प्रचार करण्यात आला. तसेच ॲट्रॉसिटीचा मुद्दाही प्रचारात प्रभावी ठरला. शरद पवार यांच्या सभाना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. तसेच विखे मतदारसंघात सक्रिय राहिले नाहीत. तसेच नकारार्थी मतांचा लाभ श्री. भाऊसाहेब वाकचौरे यांना झाला. तसेच स्थानिक उमेदवार म्हणून या निवडणूकीत श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी श्री.रामदास आठवले यांचा 1,32,751 मतांनी पराभव केला. या निवडणुकीत शिवसेनेला 54.21ः आणि आरपीआयला 34.22ः मते मिळाली.

अशाप्रकारे 2009 च्या लोकसभा निवडणुकीत देशात कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले. तसेच महाराष्ट्र राज्यातही कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला अनुकूल वातावरण असताना अहमदनगर जिल्हयात मात्र दोन्ही

मतदारसंघातील जागा कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीने गमावल्या.

एकंदरीत, 2009 ची लोकसभा निवडणूक जिल्हा पातळीवर राजकीय उलथापालथ घडविणारी कॉंग्रेस आघाडीच्या हातून युतीने दोन्ही मतदारसंघ खेचून घेणारी ठरली. मतदारसंघ पुनर्रचनेनंतर होणारी तसेच त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकातील राजकीय बदलावर परिणाम करणारी 2009 ची लोकसभा निवडणूक ही नक्कीच पहिली निवडणूक ठरली.13

यावरून असे स्पष्ट होते की, मतदारसंघ पुनर्रचनेचा जिल्हयाच्या राजकीय प्रकियेवर प्रभाव निर्माण झाला आहे. अनेक दिग्गज नेत्यांना आपल्या अस्तित्वासाठी झगडावे लागत आहे. तर नवीन नेतृत्वाचा काही ठिकाणी उदय झाला आहे म्हणजेच मतदारसंघ पुनर्रचनेमुळे जिल्हयाची राजकीय समीकरणे काही प्रमाणात बदलली आहेत. या बदलेल्या राजकीय समीकरणांचा जिल्हयाच्या राजकारणावर दीर्घकालीन परिणाम झाला आहे.

संदर्भ –

1. https://mr.m.wikipedia.org (भारतीय निवडणूक आयोग), 21߸08߸2020ण
2. पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना (मतदारसंघांची पुनर्रचना), पृष्ठ क.7, प्रतिमा प्रकाशन,2009.
3- Shankar S.L., Law and Practice of Elections in India, P.No.67, National Publishing House, 1992.
4- www.drishtiial.com, 21/08/2020.
5. पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना (मतदारसंघांची पुनर्रचना), पृष्ठ क.19,20, प्रतिमा प्रकाशन, 2009.
6- http://www.esakal.com/saptarang, 30/04/2018.
7. पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना ( मतदारसंघांची पुनर्रचना), पृष्ठ क.12, प्रतिमा प्रकाशन, 2009.
8. महाराष्ट्र शासन, मतदारसंघ पुनर्रचने संदर्भातील राजपत्र, पृष्ठ क.
9- http://en.wikipedia.org/wiki/ahmednagar _district, 01/11/2018.
10. पळशीकर सुहास, बिरमल नितीन, महाराष्ट्राचे राजकारण – राजकीय प्रकियेचे स्थानिक संदर्भ, पृष्ठ क.237, प्रतिमा प्रकाशन, 2004.
11- www.election.prahaar.in, 04/03/2014.
12- http://www.loksatta.com, ¼tqus fg'ksc pqdrs gks.kkj½] 27/10/2013.
13- http://maharashtratimes.com, 13/04/2018.